## बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि.२५ जुलै २०२५

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती २०२५ शांतता कमिटी बैठक

---

मा.पोलीस आयुक्त श्री.एम.राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती २०२५ चे अनुषंगाने सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दि.२५/०७/२०२५ रोजी १६.३०वा. पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, सोलापूर महानगर पालिकेकडील अधिकारी, धर्मादाय युक्त कार्यालयाकडील अधिकारी,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवाचे पदाधिकारी,सदस्य, यांची पोलीस आयुक्तकार्यालय येथे संयुक्तपणे बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीची प्रस्तावना श्रीमती डॉ.अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी करुन बैठक आयोजन करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला.

दि.०१/०८/२०२५ रोजी ते दि. ०३/०८/२०२५ रोजी पर्यंतचे कालावधीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव-२०२५ साजरी करण्यात येणार आहे.दि. ०३/०८/२०२५ रोजी मिरवणुकीमध्ये पारंपारीक वाद्य वाजविणेबाबत सुचना देण्यात आल्या. उत्सव काळात सर्व मंडळानी सीसीटीव्ही कॅमेरॅची व्यवस्था करावी,मंडपासाठी सार्वजनिक रस्त्याचा २/३ भाग मोकळा सोडावा मोकाट जनावरांपासुन मुर्ती/फोटोस धोका होणार नाही याची खबरदारी घ्यावी.देखावे चित्र आक्षेपार्ह नसावेत, उत्सवाचे पावित्र्य राखावे, मंडळांकडुन जाहिरात प्रदर्शन करण्यात येत असल्यास आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंदी द्यावी.तसेच स्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, साक्षरता, सायबर गुन्हेगारी यंत्रणाबाबत जनजागृती करावी.मा.सर्वोच्च न्यायालयाचे ध्वनीप्रदुषण अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.मंडाळांनी महावितरण विभागाकडुन अधिकृत विद्युत जोडणी करुन घ्यावी जेणेकरुन मंडपामध्ये शॉर्टसर्कीट होवून इजा अथवा धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी.सर्व मंडळांनी मिरवणुकीत सामिल होणाऱ्या वाहनांची आर टी ओ कडुन तपासणी करावी.मिरवणुकीमध्ये मोठे व लांब कंटेनर वापरु नये, वाहनांवरील देखाव्यांची उंची अडथळा होणारी नसावी.मिरवणुक संवेदनशिल ठिकाणी जास्त वेळ रेंगाळत ठेवू नये. इतर धर्मांच्या भावना दुखावणार नाही यांची काटेकोर दक्षता घ्यावी मंडळाने स्थापन केलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती यांचे मुर्तीसमोर स्वयंसेवक सतत हजर राहतील व मुर्तीची देखभाल करतील याची पुरेपुर काळजी घ्यावी. सोशल मिडीयावरुन काही अक्षेपार्ह मेसेजेस, फोटो, पोस्ट व्हायरल होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत त्वरीत पोलीस यंत्रणेस कळवावे.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव-२०२५ मंडळानी ऑनलाईन,ऑफलाईन पध्दतीने परवानगी घेणे बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणीकरीता प्रत्येक पोलीस ठाणे येथे स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे पालन करावे.

त्यानंतर बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी समस्या/सुचना मांडल्या.त्यानंतर सदर सुचनेचे संबंधित महानगरपालिका, महावितरण, आर टी ओ, धर्मादाय आयुक्त कार्यालय अशा खात्याचे अधिकारी यांनी सदर कामाची रुपरेषा बघुन समस्या सोडविण्यात येतील असे सांगितले.

मा.पोलीस आयुक्त सो यांनी बैठकीस उपस्थित लोकांचे स्वागत करुन मांडलेल्या अडी-अडचणीचे निरसण केले. उत्सव साजरा करताना बऱ्याचवेळी कायदेशीर बाबींचे उल्लंघन होत असते, कोणीही कायदा हातात घेऊ नये,कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा, शांतता समिती सदस्य व नागरीकांनी आपल्या परीसरातील बेकायेदशीर बाबींची माहिती पोलीसांना दिली पाहिजे.मिरवणुकी मध्ये अफवा पसरवू नये, नियमांचे पालन करावे, नियमांचे पालन नाही झाले तर कायदेशीर कारवाई होईल. शासनाने नेमून दिलेल्या सुचना पाळल्या पाहिजेत.तसेच योग्य तो बंदोबस्त नेमू असे सांगून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त शुभेच्छा देवून बैठकीला उपस्थितांचे आभार मानले.

सदर बैठकीस, मा.पोलीस आयुक्त श्री. एम.राजकुमार,मा. श्री.गौहर हसन,पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मा.श्रीमती डॉ.अश्विनी पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.विजय कबाडे, पोलीस उप आयुक्त (परीमंडळ), सहा पोलीस आयुक्त विभाग-१ श्री. पोमण ,सहा पोलीस आयुक्त विभाग-२, श्री. खिरडकर, सहा पोलीस आयुक्त श्री राजन माने(गुन्हे शाखा), तसेच सोलापूर महानगरपालिका उप-आयुक्त श्रीमती सारिका अकुलवार,महावितरण अभियंता श्री.प्रदिप मोरे,सोलापूर अग्नीशामक दलाचे श्री रावसाहेब ना सलगर,श्री किरण चव्हाण (महा.प्रदुषण नियंत्रण मंडळ) ,धर्मादाय आयुक्त कार्यालय कडील श्री भागवत अशोक फुलसुंदर तसेच सर्व पोलीस ठाणे/शाखा प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार,व शांतता कमिटीचे सदस्य, व पत्रकार बंधु उपस्थित होते.

तरी उपरोक्त प्रमाणे शांतता समितीसदस्य यांचे समवेत घेण्यात आलेल्या बैठकीतील ठळक मुद्यांबाबत आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दी करुन पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.